BJP - SHIVSENA ALLIANCE

1, Jalaram Nagar, Vallabhabaug lane, Opp. Gandhi Market, Ghatkoper (E),
Mumbai - 400 077 • Tel.: 2514 9978, 2514 7889

कृपया प्रसिद्धीसाठी                                                                                  दि.११.एप्रिल २००९

# ईशान्य मुंबईत किरीट सोमैयांच्या प्रचाराचा धुम धडाका

घेली ५ वर्षे रखडलेले कुर्ला ते ठाणे रेल मार्गाचे एका वर्षात सहा पदरीकरण, मुलुंड, भांडुप व कांजुर भागातील लोडशेडिंग बंद करणे, घरोघरी पाईप गॅस पोचवणे, वन जमीनींवर राहणा-या ४.५० लाख रहीवाश्यांना न्याय व सुरक्षा मिळवून देणे व ईशान्य मुंबईचा सर्वांगिण विकास करणे हे आपले ध्येय आहे असे उद्गगार ईशान्य मुंबईतील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार डॉ.किरीट सोमैया यांनी काढले.

विक्रोळी येथील कन्नमवार नगर येथे काढलेल्या प्रचार फेरीत सोमैया बोलत होते.

ईशान्य मुंबईत प्रचाराचे वातावरण आता चांगलेच गरम होत आहे. डॉ. किरीट सोमैया यांनी आपल्या प्रचाराची दुसरी फेरी सुरु केली असून रोज सकाळी ७.०० वाजल्या पासून प्रभात फेरी, चौक सभा, रेल्वे स्टेशन वर जाऊन जनसंपर्क, सोसायटी मिटींग व पदयात्रा अशा विभिन्न उपक्रमांद्वारे सोमैया मतदारांशी संवाद व संपर्क साधून आहेत.

डॉ.किरीट सोमैया यांचा "डाऊन टू अर्थ" प्रचाराचा पद्धतीला मतदारांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपल्या प्रचारात सोमैया मतदारांना "रियॅलीटी शो" प्रमाणे अन्नधान्यांची पाकिटे दाखवून वाढलेल्या महागाईबद्दल लोकांना जागृत करतात. लोक ही - **यावेळी बदल हवाच** - अशा पद्धतीने सोमैयांना दाद देतात.

सोमैया यांनी आपल्या रथाचे नाव **जनसुरक्षा रथ** असे ठेवले असून त्यांचा प्रचाराचा भर वाढती महागाई, लोड शेडिंग, मध्य रेल्वे च्या कारभारात सुधारणा, केंद्र शासनातर्फे होणारी मुंबईची अवहेलना, आर्थिक मंदी व तिचावर उपाय व आतंकवादाला आळा घालण्यात सरकारचे अपयश आदी विषयांवर असतो.

**दयानंद नेने**

**9004028575**



N-E Mumbai Candidate : Kirit Somaiya